॥ मानसीचा चित्रकार तो, तुझे निरंतर चित्र काढतो ॥

गायकः पं. हृदयनाथ मंगेशकर
गीतः पी. सावळाराम
संगीतः श्रीनिवास खळे

मानसीचा चित्रकार तो, तुझे निरंतर चित्र काढतो ॥ धृ. ॥

भेट पहिली अपुली घडता, निळी मोहिनी नयनी हसता
उडे पापणी किंचित ढळता।
गोड टपोरे रंग उषेचे,
रंग उषेचे भरतो ... चित्र काढतो ॥ १ ॥

ममस्पर्शाने तुझी मूग्धता, ओठ बोलती तुला न कळता
माझ्याविण ही तुझी चारुता ।
मावळतीचे सूर्यफूल ते,
सूर्यफूल ते करतो ... चित्र काढतो ॥ २ ॥

तुझ्या परि तव प्रिती करता, संगम देखुन मागे फिरता
हसरी संध्या रजनी होता ।
नक्षत्रांचा निळा चांदवा,
निळा चांदवा भरतो ... चित्र काढतो ॥ ३ ॥